# वसई-विरार शहर महानगरपालिका
## वैद्यकीय आरोग्य विभाग

दि.१४/०८/२०२२

**प्रेसनोट**

भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त 'स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव' संपूर्ण देशात साजरा करण्यात येत असून स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त वसई विरार शहर महानगरपालिकेच्या **वैद्यकीय आरोग्य विभागांतर्गत** कार्यरत असलेली ६ रुग्णालये, ३ माता बाल संगोपन केंद्रे, २१ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे व ५ दवाखाने यांच्या सहभागाने **दि.०७ ऑगस्ट,२०२२ ते १३ ऑगस्ट,२०२२** या कालावधीत **'रक्तदान शिबिरांचे'** आयोजन करण्यात आले होते. सदरचे रक्तदान शिबीर १) दि.०७ ऑगस्ट रोजी सर डी.एम.पेटीट रुग्णालय, वसई(प.) २)दि.१० ऑगस्ट रोजी माता बाल रुग्णालय, सातिवली ३) १२ ऑगस्ट रोजी बोळींज रुग्णालय, विरार (प.) व नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र, वालीव ४)दि.१३ ऑगस्ट रोजी सोपारा सामान्य रुग्णालय व माता बाल संगोपन केंद्र, जुचंद्र या ६ ठिकाणी आयोजित करण्यात आले होते. या शिबिरांमध्ये एकूण **४२३ रक्तदात्यांची** रक्तदान केले.

तसेच स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त **'घरोघरी तिरंगा'** या उपक्रमाची व **'कोविड लसीकरणाबाबत'** जनजागृती करण्यासाठी वैद्यकीय आरोग्य विभागामार्फत शालेय विद्यार्थ्यांचा सहभाग घेऊन वसई, विरार व नालासोपारा परिसरात **रॅली** काढण्यात आली. या रॅलीमध्ये शहरातील अनेक पदाधिकारी, मान्यवर व नागरिक उत्स्फूर्तपणे सहभागी झाले होते.

सदर रक्तदान शिबीर व रॅली मार्फत जनजागृती करणे बाबत मा.आयुक्त तथा प्रशासक, वसई विरार शहर महानगरपालिका, मा.अतिरिक्त आयुक्त, मा.उप-आयुक्त (वैद्यकीय आरोग्य विभाग) व प्र.मुख्य वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांच्याकडून मार्गदर्शन मिळाले. तसेच वैद्यकीय आरोग्य विभागातील सर्व वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी वर्ग यांचे मोठ्या प्रमाणात योगदान लाभले.

**वैद्यकीय आरोग्य विभाग**
**वसई विरार शहर महानगरपालिका**